जा.क्र. स्था.गु.शा/प्रेस नोट/ 3096 /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग,
फॅक्स नं. 02362-228205,
दिनांक -17 /10/2020.

# प्रेस नोट

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदूर्ग कडून गावठी दारु व हातभट्टी बाबत करण्यात आलेली कारवाई.

---

मा. पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सिंधुदूर्ग जिल्ह्यात गावठी हातभट्टीच्या दारु विरोधात कारवाईसाठी मोहीम आखण्यात आली होती.

दि.17.10.2020 रोजी पहाटे घोणसरी गावातील नदी पात्रालगत जंगलमय भागात सुरु असलेल्या गावळी दारुच्या हातभट्ट्यांवर श्री.सुनिल धनावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. तीन ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईमध्ये **एकुण 1,83,050/- रुपये (एक लाख त्र्याऐंशी हजार पन्नास रुपये) किंमतीची 512 लिटर गावठी दारु, रसायन व हातभट्टीचे सामान असा मुद्देमाल जप्त** करण्यात आलेला आहे. सदरबाबत कणकवली पोलीस ठाणे येथे 3 गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

1) कणकवली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. 234/2020, महाराष्ट्र प्रोहीबिशन ॲक्ट कलम 65(ब), (क), (ड), (ई), (फ) या गुन्ह्यात आरोपीत व्हीक्टर बस्त्याव बारेट, रा.घोणसरी, टेंबवाडी, ता.कणकवली याचे ताब्यातून **15 लिटर गावठी दारु, रसायन व हातभट्टीचे साहीत्य मिळून एकुण 53,950/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आलेला आहे.
2) कणकवली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. 236/2020, महाराष्ट्र प्रोहीबिशन ॲक्ट कलम 65(ब), (क), (ड), (ई), (फ) या गुन्ह्यात आरोपीत जॉन मोतेस पिन्टो, रा.घोणसरी, टेंबवाडी, ता.कणकवली याचे **ताब्यातून 7 लिटर गावठी दारु, रसायन व हातभट्टीचे साहीत्य मिळून एकुण 57,100/- रुपये किंमतीचा** मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
3) कणकवली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. 237/2020, महाराष्ट्र प्रोहीबिशन ॲक्ट कलम 65(ई) या गुन्ह्यात आरोपीत श्रीमती.जोसपीन व्हीक्टर बारेस, रा.घोणसरी, टेंबवाडी, ता.कणकवली याचे ताब्यातून **72,000/- रुपये किंमतीची 490 लिटर गावठी दारु जप्त** करण्यात आलेला आहे.

सदर कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक- श्री.सचिन शेळके व श्री.शाहू देसाई, सहा.पोलीस उपनिरीक्षक- श्री.रामचंद्र शेळके, पोलीस हवालदार- श्री.गुरुनाथ कोयंडे, पोलीस नाईक- श्री.प्रकाश कदम व श्री.कृष्णा केसरकर, पोलीस कॉन्स्टेबल- श्री.जयेश सरमळकर, श्री.संकेत खाडे व श्री.ज्ञानेश्वर कांदळगांवकर व महिला पोलीस कॉन्स्टेबल कु.प्रतिक्षा कोरगांवकर यांनी सहभाग घेतला.

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक, स्थागुशा सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग